<u>न्यायालयीन प्रकरण</u>

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५, १ ला मजला, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**दुरध्वनी क्र.** (०२२) २०८२०४२४ Email: est१४-rdd@mah.gov.in

क्र.न्यायाप्र-१३२५/प्र.क्र.१००/आस्था-१४ दिनांक :-१३ मे, २०२५

**प्रति,**
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय :-** मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.५२०६/२०२५, ५२०७/२०२५ व ५२०८/२०२५ बाबत

**संदर्भ :-**१. मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांचे दि.०९.०५.२०२५ रोजीचे आदेश.
२.शासन पत्र क्र.बैठक-१४२५/प्र.क्र.७२/आस्था-१४, दि.२८.०३.२०२५

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे दाखल याचिका क्र. ५२०६/२०२५ व अन्य संलग्न याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.०९.०५.२०२५ रोजी दिलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच संदर्भ क्र. २ येथील शासन समक्रमांक दि.२८.३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित इतिवृत्तातील अनुक्रमांक ३ येथे दिलेले निर्देश रद्द करण्यात येत आहेत.

२. उपरोक्त न्यायनिर्णयाद्वारे मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी आपसी आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम, १९६७ मधील नियम ६(८)(२) नुसार सेवाज्येष्ठता अनुज्ञेय करुन त्यानुसार शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदलीचे ऑनलाईन पोर्टलवर त्यांच्या कार्यरत जिल्ह्यातील रुजू दिनांकामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याबाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करुन त्यानुसार बदली पोर्टलवर या शिक्षकांचे प्रोफाईल अपडेट करण्याची कार्यवाही चार दिवसांमध्ये पूर्ण करण्याची आपणांस विनंती आहे.

आपली,

(नीला रानडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव:-**

१) मे.विन्सीस आयटी सर्व्हिसेस प्रा.लि.,पुणे.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व).